दि. 05/03/2024

दै. लोकमत

# झरी येथे पोलिसांनी रोखला बालविवाह



लोकमत न्यूज नेटवर्क

**मरखेल :** देगलूर तालुक्यातील झरी येथील एका १४ वर्षीय मुलीचा विवाह शेजारील गावच्या युवकाशी लावण्यात येणार होता. विवाहापूर्वीच चाइल्डलाइन व मरखेल पोलिसांनी झरी या गावात जाऊन विवाह रोखला. हा प्रकार ४ मार्च रोजी उघडकीस आला.

चाइल्डलाइनला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, देगलूर तालुक्यातील झरी या गावी एका १४ वर्षीय मुलीचा १५ दिवसांपूर्वी रोखण्यात आलेला बालविवाह परत घडून येत असल्याची माहिती मिळताच जिल्हा महिला बाल विकास अधिकारी आर. आर. कांगणे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे तसेच चाइल्डलाइनच्या सुपरवायझर ऐश्वर्या शेवाळे, दीपाली हिंगोले यांनी बालविवाहाबाबतची माहिती मरखेल पोलिस स्टेशनला दिली. पोलिसांनी पीडित बालिकेची व तिच्या कुटुंबीयांची भेट घेऊन बालविवाह थांबविण्यात आला.

मरखेल सहायक पोलिस निरीक्षक संकेत दिघे व बीट जमादार शेख अब्दुल बारी यांनी मुलीच्या पालकांना ताकीद देऊन आई, वडील यांचे समुपदेशन केले.

सहायक पोलिस निरीक्षक संकेत दिघे यांनी मुलीच्या १८ वर्षांपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याचे आश्वासन दिले.

दै. गोदातीर

# झरी येथे होणारा बालविवाह रोखला; चाईल्ड लाईन-१०९८ ला यश



**नांदेड-** देगलूर तालुक्यातील झरी या गावी एका १४ वर्षीय मुलीचा १५ दिवसांपूर्वी बालविवाह रोखण्यात आला होत. हा बालविवाह पुन्हा लावण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळताच जिल्हा महिला बाल विकास अधिकारी आर. आर. कांगणे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे तसेच चाईल्ड लाईनच्या टीमने थांबविला.

चाईल्ड लाईनच्या पर्यवेक्षक ऐश्वर्या शेवाळे, केस वर्कर दिपाली हिंगोले यांनी तात्काळ सदर बालविवाहाबाबतची माहिती मरखेल पोलीस स्टेशनला दिली. पीडित बालिका व तिच्या कुटुंबियांची भेट घेऊन समुपदेशनाच्या माध्यमातून पुन्हा होणारा बालविवाह थांबविण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांनी मुलीच्या पालकांना सक्त ताकीद दिली. तसेच आई-वडिलांचे समुपदेशन करून मुलीचे वय १८ वर्षे होईपर्यंत शिक्षण घेण्याविषयी मुलीस व मुलीच्या पालकास समजविण्यात आले.

दै. गोदातीर

# अवैध वाळू उपसा करणाऱ्या तीन हायवासह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड-** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विनापरवाना बेकायदेशीररित्या अवैध वाळूचा उपसा करून वाहतूक करणाऱ्या तीन हायवासह ४० लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई दोन मार्चच्या रात्री काळेश्वर कमानीजवळ करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे आणि त्यांचे सहकारी दोन मार्चच्या रात्री दहा वाजताच्या सुमारास गस्त घालत होते. या भागातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू वाहतूक होत असते. पोलिसांच्या सापळ्यामध्ये (एम एच २६- बीई-५९ २७), (एमएच २६-बीई- १७ ०७) आणि टिप्पर (एमएच २२- एन- १८ २२) या जवळपास ५० हजार रुपयांची वाळूसह तिन्ही टिप्पर जप्त करून नांदेड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. मध्यरात्रीच जप्ती पंचनामाही करण्यात आला. सदरची वाळू शेख मेहराज या वाळू माफियाने भरून दिल्याचेही पोलीस तक्रारीत नमूद केले आहे. पोलीस अंमलदार रुपेश दासरवाड यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात हायवाचे चालक-मालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी चालक आनंद चांदू वाघमारे, मनोज लक्ष्मण सरोवर यांना अटक केली. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली शेख सत्तार करत आहेत.